REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# मराठी विज्ञानसाहित्यः उद्‌गम व विकास

**डॉ. देविदास रावजी गायकवाड**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग**
**द.भ.फै. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर**

## *प्रस्तावना*




आधुनिक मराठी साहित्यातील विज्ञानसाहित्य हा एक महत्त्वाचा व लोकप्रिय वाङ्‌:मयप्रकार होय. पाश्यात्य देशात विशेषतः युरोप व अमेरिकेत सर्वप्रथम विज्ञानसाहित्याचा जन्म झाला. या साहित्यप्रकारास पूर्वी 'सायंटिफिक्शन' म्हटले जात असे, नंतर 'सायन्स फिक्शन' म्हटले जाऊ लागले. भविष्यात घडू शकणाऱ्या घटनांचा वेध विज्ञान साहित्यातून घेतला जातो, तसेच त्याचे मानवी जीवनावर कोण-कोणते परिणाम होऊ शकतात, त्यातुन काय प्रगती साधली जाऊ शकते. त्याची लालित्यपूर्ण माहिती विज्ञान साहित्यातून व्यक्त झालेली असते; तथापि विज्ञान प्रगतीचा आलेख येथे अपेक्षित नाही. मानवी जीवनातील परस्पर संबंधाचे चित्रण महत्त्वाचे ठरते. विज्ञान साहित्याच्या निर्मितीसाठी वैज्ञानिकच असलं पाहिजे असे नाही, तर विज्ञानकल्पना व निर्मिती क्षमता, सामाजिक भान तसेच भाषाकौशल्य हवे. थोडक्यात सध्य:स्थितीतील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतिचा भविष्य काळात मानवी जीवनावर कोणता परिणाम होईल. त्या काळातील समाज कसा असेल, मानवी परस्पर संबंध कसे असतील याचे चित्रण करणारे साहित्य म्हणजे विज्ञानसाहित्य होय. यालाच इंग्रजीत 'सायन्स फिक्शन' असे म्हणतात.

आधुनिक मराठीतील अन्य वाङ्‌:मयप्रकाराप्रमाणेच विज्ञान साहित्याचा नेमका उदय कधी झाला याविषयी अभ्यासकात मतभिन्नता आढळते. मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडले ते ब्रिटिश राजवटीच्या काळात. इंग्रजी भाषा व साहित्याचा परिचय, विविध सामाजिक चळवळी, लढे सत्याग्रह व शिक्षणाच्या प्रचार-प्रसारामुळे भारतीयांच्या जीवनात बदल घडले त्याचे चित्रण मराठी साहित्यातही उमटू लागले. त्यातुन विविध वाङ्;मयीन प्रवाह उदयास आले. परिणामी मराठी साहित्य अधिक समृध्द व संपन्न समाजाभिमुख झाले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, याप्रमाणेच विज्ञान साहित्य हा आधुनिक मराठीतील एक लौकिकप्राप्त वाङ्‌:मयप्रकार होय.

मराठीतील पहिली विज्ञान साहित्य म्हणून ' चंद्रलोकाची सफर' या कादंबरीचा उल्लेख केला जातो. जुल्स व्हर्नच्या 'फ्रॉम अर्थ टू द मून' या इंग्रजी कादंबरीचा हा मराठी अनुवाद. तत्कालीन प्रसिध्द 'केरळकोकीळा' मासिकाचे संपादक कृ.ना.अठले यांनी हा अनुवाद क्रमश; प्रसिध्द केल्याची नोंद आढळते. १९०८ मध्ये नाथमाधव यांची ' श्रीनिवासराव ' ही कादंबरी प्रसिध्द झाली. ही एक महत्त्वाची विज्ञानवादी कादंबरी होय. नंतरच्या काळात वामन मल्हार जोशी व श्री. बा. रानडे यांनी विज्ञान प्रगतीवर आधारीत लिहिलेल्या कथा लोकप्रिय ठरल्या. द.पा. खांबेटे यांची ' चंद्रावरचा खून' व ' माझं नाव रमाकांत वालावलकर' (१९६०) ही विज्ञानवादी पुस्तके प्रसिध्द झाली. आकर्षक शैलीमुळे त्याची ही पुस्तक विशेष लोकप्रिय ठरली. १९६५ मध्ये दि.बा. मोकाशी यांचा 'बालचंद्र' हा महत्त्वाचा विज्ञानवादी कथाग्रंथ प्रसिध्द झाली. अणुयुध्द झालेतर मानवी जीवनावर त्यांचा काय परिणाम होईल त्यावर नेमकेपणाने भाष्य करणाऱ्या कथा त्यांनी लिहील्या. १९६६ मध्ये 'उडती तबकडी' हा भा. रा. भागवतांच्या सात कथांचा संग्रह प्रसिध्द झाला. मानवी जीवनावरील विज्ञानाचा परिणाम दर्शविणारा हा एक महत्त्वाचा कथासंग्रह होय. १९६७ मध्ये 'क्षितिज सीमा' हा विद्याधर सहस्त्रबुध्दे यांचा कथासंग्रह म्हणजे विज्ञान साहित्याचा जणू मानबिंदु होय. नारायण धापा हे एक महत्त्वाचे विज्ञान कथालेख. त्यांनी विपुल प्रमाणात विज्ञान कथा व कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या 'कालगुंफ पारंब्याचे जग', 'कपटी कंदार', 'बहुमनी' या कादंबऱ्या तसेच 'चंद्राची सावली' व 'समर्थ' हे कथासंग्रह महत्त्वाचे ठरतात. याच काळात दि.बा. मोकाशी, वि.वा. शिरवाडकर, ना.के. बेहेरे, आरुण साधू आणि मिलिंद बोकील आदिनी विज्ञान आणि समाजाचा मेळ घालणाऱ्या कथ लिहून विज्ञान साहित्यात मौलीक भर घातली आहे.

१९७५ नंतरच्या काळात विज्ञानसाहित्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विज्ञानसाहित्य विषयक जागृती व जयंत नारळीकरासारखे थोर वैज्ञानिकांचे विज्ञानवादी साहित्य लेखन हे या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. त्यांनीच मराठी विज्ञानसाहित्याला प्रतिष्ठा मिळवून दिली १९७७ पासुन नियमितपणे प्रसिध्द होणारे व विज्ञानसाहित्याला वहिलेलं 'सृष्टीज्ञान' या दिवाळी अंकानेही या साहित्याला समृध्द करण्यात दिलेले योगदान महत्त्वाचे ठरते. या शिवाय मराठी विज्ञान परिषदेकडून नियमित आयोजित केले जाणारे विज्ञान विषयक परिसंवाद तसेच कार्यशाळांनी दिलेले योगदान महत्त्वाचे ठरतात.

विज्ञान साहित्यात महत्त्वाची भर घालणारा जयंत नारळीकरांचा 'यक्षाची देणगी' हा कथासंग्रह १९७९ मध्ये प्रसिध्द झाला. मनोरंजन आणि विज्ञानविषयक दृष्टीकोन वाचकांच्यात निर्माण करण्यात यशस्वी ठरलेल्या या संग्रहातील कथा अभ्यासनीय आहेत. मराठी विज्ञान साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांच्या विज्ञानकथा मराठी विज्ञान कथेच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरल्या. भालचंद्र वामन केळकर या रसायनशास्त्र अभ्यासकाने केवळ विज्ञानकथा लिहील्या नाहीत तर गावोगावी जाऊन कथाकथनाच्या प्रयोगाद्वारे विज्ञान साहित्य विस्तारात महत्वपूर्ण योगदान दिले. ' विज्ञानाला पंख कल्पनेचे ' हा त्यांचा कथासंग्रह लौकिक प्राप्त ठरला आहे.

बाळ फोंडके यांनीही दर्जेदार विज्ञानकथा लिहून विज्ञानसाहित्याला समृध्द करण्यात महत्त्वपुर्ण योगदान दिले आहे. त्यांचे 'चिरंजीव', 'अमानुष', 'गुड बाय अर्थ' 'व्हर्चुअल रिॲलिटी' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. लक्ष्मण लोंढे हे आणखी एक महत्त्वाचे विज्ञानवादी साहित्यिक त्यांचा 'आइनस्टाईन' हा १९९१ मध्ये प्रसिध्द झालेला कथासंग्रह वैशिष्टपुर्ण ठरला.

१९९० नंतरच्या काळातील उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाने मराठी साहित्यात काही नव्या जाणिवा आल्या. विज्ञान क्षेत्रातील क्रांती आणि त्याचा मानीव जीवनावर झालेला परिणाम याचे नेमके चित्रण सुबोध जावडेकर यांच्या कथामध्ये आढळते. त्यांचा ' अर्थशून्य भाषे मज ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. विज्ञानाचा मानवी जीवनावरील परिणाम नेमक्या शब्दात आकर्षकरित्या ते आपल्या कथातून मांडतात. मानवतावादी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या सुबोध लेखनशैलीतील त्यांच्या कथांनी मराठी विज्ञानकथा आधिक समृध्द व अभिरुची संपन्न केली आहे. शुभदा गोगटे यांची ' यंत्रपाणी' ही कांदबरी आणि ' मार्जिनल्स' हा कथासंग्रह मराठी विज्ञानवादी साहित्यात मौलिक ठरला आहे. जयश्री थत्ते या आणखी एक महत्वाच्या विज्ञान कथा लेखिका त्यांचा 'मानवाचे वरदान' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. जैवतंत्रज्ञानामुळे मानवी जीवनातील क्रांतीवर नेमक्यापणे भाष्य करणाऱ्या कथा या संग्रहात आहेत. यशवंत देशपाडे लिखित ' उत्क्रांतीच्या शिडीवर' संजय ढोले यांचा 'प्रतिशोध' जगदीश काब्रे यांचा ' कालयंत्र ' बा.मो. कानिटकर यांचा ' विज्ञानातील गमती जमती ', डॉ. आरुण मांडे यांचा ' विज्ञान गमती व डॉ. व्ही.एन.शिंदे यांचा ' एकांकाचे मानकरी ' तसेच शिवाजीराव मोहिते व प्रा. निरंजन घाटे यांनी संपादित केलेला ' विज्ञान कथाविश्व ' हे आणखी काही महत्वाचे कथासंग्रह होय.

अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात मराठी विज्ञान साहित्यांची विशेषतः कथा कांदबऱ्यांची निर्मिती होत आहे. माधुरी शानभाग, श्रीमती सुधा रिसबुड, श्रीमती स्मिता पोतनीस, डॉ. आरुण मांडे, डॉ. संजय ढोले, प्रा. डॉ. सुनिल विभूते प्रा. यशवंत देशपांडे व प्रा. शिवाजीराव पवार यांनी भावाना आणि विज्ञान यांचा सुरेख मेळ घालत वैविध्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण कथा-कादंबऱ्यांची निर्मिती करुन विज्ञानसाहित्याचे दालन समृध्द करीत आहेत. ही मराठी साहित्यांच्या दृष्टीने आनंदाची गोष्ट आहे. माहिती आभावी सर्वच विज्ञान लेखकांचा येथे विचार शक्य नाही. केवळ विज्ञान साहित्याचा उदय व विकासाच्या अनुषंगाने आढावा घेण्याचा प्रस्तुत ठिकाणी प्रयत्न केला आहे. मराठी विज्ञान साहित्यातील ही विविधता व व्यापकता लक्षात घेऊन संशोधनात्मक अभ्यास होण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

### संदर्भ ग्रंथः-


१) मराठी वाङ्‌मयाचा इतिहास खंड सातवा: १९५० ते २००० भाग पहिला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-३०

२) विज्ञान कथा विश्व, संपादक निरंजन घाटे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-३०

३) मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप (१९५०-१९७५) संपादक गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई